* माहिती *

**वाशिम जिल्हा पोलीस दल**

visit as http://www.washimpolice.org

प्रेस नोट

---

**पोलीस कल्याण सप्ताहअंतर्गत जिल्हा पोलीस अधीक्षकांकडून वैविध्यपुर्ण कार्यक्रमाचे आयोजन.**

जिल्हा पोलीस अधीक्षक, श्री वसंत परदेशी यांनी वाशिम जिल्हयाचा प्रभार घेतल्यानंतर अनेक नाविण्यपुर्ण उपक्रम हाती घेतलेले आहेत. पोलीस कल्याण सप्ताहाचे आयोजन करुन त्यात महिलांसाठी रांगोळी,पाककला स्पर्धा, योग शिबीर अशा विवीध कार्यक्रमाचे आयोजन केले.

जिल्हयातील पोलीस कल्याण सप्ताहा दरम्यान घेण्यात आलेल्या नाविन्य पुर्ण उपक्रमामुळे पोलीस कुटुंबामध्ये समाधानाचे व उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. दिनांक २३/०७/१९ रोजी आयोजित पाककला स्पर्धेकरिता भरपुर संख्येने महिला उपस्थित राहुन वेगवेगळया चविष्ट पदार्थ बनवुन कार्यक्रमाची लज्जत वाढविली. पाककला कला स्पर्धेकरीता परिक्षक म्हणुन श्रीमती विजयश्री ऋषिकेश मोडक (जिल्हाधिकारी वाशिम यांच्या पत्नी), श्रीमती सुजाता विजयकुमार चव्हाण (अपर पोलीस अधिक्षक यांच्या पत्नी) प्राध्यापक डॉ मेघा देशमुख सावित्री बाई फुले महिला विदयालय हया उपस्थित होत्या.

दिनांक २५/०७/१९ रोजी आयोजित रांगोळी स्पर्धेकरीता बेटी बचाव व जलसंधारण हया विषय रांगोळी करीता देण्यात आले होते. रांगोळी स्पर्धेकरीता मुली व महिला यांनी निरनिराळया रंगसंगतीत रंग भरुन जुन्या पोलीस मुख्यालय येथील हॉल भरुन टाकला होता. रांगाळी स्पर्धेकरीता परिक्षक म्हणुन श्रीमती सुजाता विजयकुमार चव्हाण (अपर पोलीस अधिक्षक यांच्या पत्नी) श्रीमती डॉ शुभांगी दामले प्राध्यापक सावित्री बाई फुले महिला विदयालय हया उपस्थित होत्या. दिनांक २२/०७/१९ ते २७/०७/१९ या दरम्यान आयोजित योग शिबीराकरीता वेळात वेळ काढुन पोलीस वसाहतीत मोठया संख्येने महिला पहाटेच उपस्थित राहुन योगाचे धडे घेत आहेत. उदया दिनांक २७/०७/१९ रोजी योग शिबीराची सांगता होणार असुन त्यादिवशी वसाहत मधील उत्साही महिला व महिला कर्मचारी यांनी वृक्ष लागवडीचा उपक्रम हाती घेतला आहे.

याच कार्यक्रमादरम्यान पोलीस दलातुन सेवानिवृत्त होत असलेले पोलीस अधिकारी/कर्मचारी यांना आमंत्रित करुन त्यांना पोलीस दलातील बजाविलेल्या कामगिरीबद्दल शाल, श्रीफळ,भेटवस्तु देवुन गौरविण्यात आले तसचे त्यांचे सेवानिवृत्तीनंतरच्या वाटचालीकरीता शुभेच्छा देण्यात आल्या. तसेच उपविभागीय पोलीस अधिकारी श्रीमती नंदा पराजे, सपोनी उदय सोयस्कर, लिपिक श्री देशमुख, यांची वाशिम जिल्हा पोलीस दलाचे अस्थापनेतुन अन्य जिल्हयात बदली झाल्याने त्यांना निरोप संमारंभ देऊन त्यांना पुढील वाटचाली साठी शुभेच्छा देण्यात आल्या.

पोलीस कल्याण सप्ताहादरम्यान आयोजित स्पर्धेतिल विजेत्यांना मा. विशेष पोलीस महानिरिक्षक श्री मकरंद रानडे, परिक्षेत्र अमरावती, अमरावती यांच्या हस्ते बक्षिस वितरण करण्यात येणार आहे.

पोलीस निरिक्षक

स्थानिक गुन्हे शाखा,वाशिम